www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-195 • Sunday, 17 December 2023 •Pages-04 •Rs.2/-

## अनमोल विचार

"स्वप्ने मिळविण्यासाठी हुशार नाही वेडे व्हावे लागते."

## लक्षवेधी

### कॅबमध्ये हवाई दलाच्या जवानाशी गैरवर्तन ! ओला कंपनीला केंद्राने बजावली नोटीस

**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारी विंग कमांडर शंतनू यांच्यासोबत झालेल्या गैरवर्तनाबद्दल केंद्र सरकारने कॅब ऑपरेटर कंपनी ओलाकडून उत्तर मागितले आहे. शुक्रवारी, सीसीपीडी यांनी ओला कॅबला नोटीस बजावून त्यांच्याकडून ३० दिवसांच्या आत स्पष्टीकरण आणि उत्तर मागितले आहे. ओला कॅबच्या ड्रायव्हरने एअरफोर्स ऑफिसर शंतनू यांच्याशी गैरवर्तन करून त्यांच्या पत्नीला दुखावल्याचा आरोप आहे. विंग कमांडर शंतनू दिव्यांग आहेत.ओला कॅब चालकाने भारतीय वायुसेनेच्या दिग्गज जवानाची व्हीलचेअर नेण्यास नकार दिल्याने ही नोटीस देण्यात आली आहे. विंग कमांडर शंतनू यांनी थोड्या अंतरासाठी ओला कॅब बुक केली होती. त्यांच्या पत्नीने ड्रायव्हरला व्हीलचेअर फोल्ड करून मागच्या सीटवर ठेवण्याची विनंती केली होती.मात्र, अद्याप ओळख न पटलेल्या संबंधित चालकाने अपशब्द वापरून आक्रमकपणे उत्तर दिल्याचा आरोप आहे. त्याने व्हीलचेअर ठेवण्यास नकार दिला आणि जोडप्याला कॅब सोडण्यास सांगितले.

### विजय दिनानिमीत्त १९७१ च्या युद्धातील शहीदांना मानवंदना !

**नवी दिल्ली :** देशात शनिवारी विजय दिवसाच्या निमीत्ताने १९७१ च्या युद्धातील शहीदांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. संरक्षणमंत्र्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करून शहीद झालेल्या वीरांना श्रद्धांजली वाहिली. संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे, नौदल प्रमुख ॲडमिरल आर हरी कुमार, संरक्षण सचिव गिरीधर अरमाने आणि हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल एपी सिंग. यांनीही यावेळी श्रद्धांजली अर्पण केली.

### मुसलमानांना श्रीरामजन्मभूमीच्या बदल्यात दिलेल्या जागेवर देशातील सर्वात मोठी मशीद उभी रहाणार !

**अयोध्या :** उत्तरप्रदेश येथील श्रीरामजन्मभूमीवर २२ जानेवारी २०२४ या दिवशी भव्य श्रीराममंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्याचप्रमाणे अयोध्येपासून २५ कि.मी. अंतरावर असलेल्या धन्नीपूर गावात बांधण्यात येर्णाया मशिदीचा पायाही रचण्यात येणार आहे. ही भारतातील सर्वांत मोठी मशीद असणार आहे. या मशिदीचे नाव 'महंमद बिन अब्दुल्ला', असे असणार आहे. येथे पहिले नमाजपठण मक्केतील इमाम अब्दुल रहमान अल सुदाईस करणार आहेत, अशी माहिती मुंबईतील भाजपचे नेते हाजी अराफत शेख यांनी दिली. त्यांना 'मशीद विकास समिती'चे अध्यक्ष करण्यात आले आहे.

### आम आदमी पक्षाने राघव चड्ढा यांच्याकडे सोपवली नवी जबाबदारी

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाने राज्यसभाखासदार राघव चड्ढा यांच्याकडे नवी जबाबदारी सोपवली आहे. खासदार संजय सिंह यांच्या अनुपस्थितीत आम आदमी पक्षाने राघव चड्ढा यांना राज्यसभेत पक्षनेते केले आहे.खासदार संजय सिंह यांना अंमलबजावणी संचालनालयाने दिल्ली अबकारी धोरण प्रकरणात अटक केली असून सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. संजय सिंह यांच्या अनुपस्थितीत राघव चड्ढा यांना राज्यसभेत आम आदमी पक्षाचे नेते बनवण्यात आले आहे. दरम्यान, 24 जुलै रोजी आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी मणिपूरमधील घटनेबाबत सभापतींच्या खुर्चीसमोर निदर्शने केली होती. त्यानंतर त्यांना संपूर्ण पावसाळी अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले होते. राघव चड्ढा हे आम आदमी पक्षातील एक प्रमुख चेहरा असून ते पक्षाच्या वतीने राज्यसभेत बोलत असतात. नुकतेच ते केंद्रीय निवडणूक आयुक्तांशी संबंधित विधेयकावरील चर्चेदरम्यान बोलत होते.

### 'माझ्याकडे सापडलेले ३५४ कोटी माझे नाहीत, तर आमच्या आस्थापनाचे !' - काँग्रेसचे खासदार धीरज साहू

**झारखंड :** झारखंडमधील काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार धीरज साहू यांनी १० दिवसांनी प्रसारमाध्यमांसमोर येऊन स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले, "हे सर्व पैसे माझे किंवा काँग्रेस पक्षाचे नसून माझे कुटुंबीय आणि आस्थापन यांचे आहेत. ते प्रत्येक गोष्टीचा हिशेब देतील."साहू पुढे म्हणाले की, यात लपवण्यासारखे काही नाही. मी आत्मविश्वासाने सांगत आहे की, मी सर्व गोष्टींचा हिशेब देईन. काही दिवस थांबा. मी सर्व काही जनतेसमोर ठेवीन. त्यानंतर मग सर्वांना कळेल की, हा काळा पैसा आहे कि नाही ? आमचा प्रत्येक व्यवसाय माझ्या कुटुंबाच्या नावावर आहे. आम्ही ६ भाऊ आणि त्यांची मुले. प्रत्येकजण व्यवसायाशी संबंधित आहेत. हा १०० वर्षे जुना व्यवसाय आहे. सर्व दारूविक्री रोखीने केली जाते. विक्रीतून मिळालेले हे पैसे आहेत. हा संपूर्णपणे आमच्या आस्थापनाचा पैसा होता. हा पैसा बेकायदेशीर असल्याचे अद्याप आयकर विभागाकडून सांगण्यात आलेले नाही. या संदर्भात मला जेव्हा चौकशीसाठी बोलावले जाईल, तेव्हा मी पूर्ण हिशोब देईन.

### देशातील न्यायालयांमध्ये ५ कोटींहून अधिक खटले प्रलंबित !

**नवी दिल्ली :** देशातील न्यायालयांमध्ये ५ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत, अशी माहिती केंद्रीय कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. कायदामंत्र्यांनी दिलेली माहिती १ डिसेंबरपर्यंत देशभरातील न्यायालयांमध्ये ५ कोटी ८ लाख ८५ सहस्र ८५६ प्रकरणे सुनावणीसाठी शेष आहेत. त्यापैकी २५ उच्च न्यायालयांमध्ये ६१ लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. सध्या सर्वोच्च न्यायालयात ८० सहस्र खटले प्रलंबित आहेत. १ जुलै या दिवशी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणांची संख्या ६९ सहस्र ७६६ होती, जी १ डिसेंबरला ८० सहस्रांहून अधिक आहे. ३ वर्षांपूर्वी प्रलंबित प्रकरणांची संख्या १० सहस्रांनी वाढण्यासाठी मार्च २०२० ते जुलै २०२३ इतका कालावधी लागला होता.

# सरकार अदानींच्या दारी, पण धारावी झुकणार नाही, उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल



## "सरकार येतं आणि जातं, तुमचा रेकॉर्ड खराब करू नका", ठाकरेंचं पोलिसांना भावनिक आवाहन

**■मुंबई। यश सावंत,**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मोर्चा धारावीत पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी धारावीच्या पुनर्विकासाचं काम अदानींना दिल्याच्या मुद्यावरुन हल्लाबोल केला. उद्धव ठाकरेंनी जमललेल्या धारावी, मुंबई आणि महाराष्ट्रप्रेमींचा धारावीसाठी संघर्ष सुरु आहे, असं म्हटलं. शनिवारी मुंबईतील मोजके कार्यकर्ते रस्त्यावर आलेलो आहोत. अदानींची दलाली घेतलीय त्या सुपारीबाजांना सांगतोय की हा आडकित्ता पहा किती मोठा आहे. पन्नास खोके कमी पडायला लागली म्हणून धारावी आणि मुंबई गिळायला निघालेले आहेत, अशी टीका ठाकरेंनी केली. राज्यातील सरकार अदानीच्या दारी आहे. धारावीतील सर्व गोष्टींचा टीडीआर अदानींना देऊन टाकला आहे. सब भूमी अदानी की होऊ देणार नाही, असंही ठाकरे म्हणाले. अडीच वर्ष यशस्वीपणे चालणारं सरकार गद्दारी करुन कुणी पाडलं हे तुमच्या लक्षात आलेलं असेल. गुवाहाटीला जाण्यासाठी विमानं कुणी पुरवली असतील, हे लक्षात आलेलं असेल. उद्धव ठाकरे सत्तेवर आहेत तोपर्यंत मुंबई गिळता येणार हे लक्षात आल्यानं सरकार पाडलं की काय असं वाटू लागलंय, असं उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले, 'घराला घर दिल्याशिवाय धारावीकरांच्या केसालाही धक्का लावू देणार नाही. जिथल्या तिथं घर हवं. पात्र अपात्र आम्ही मानत नाही. व्यवसायासाठी जागा द्या, कोळीवाडा-कुंभारवाड्यांचं सीमांकन द्या. लोणची पापड सारख्या व्यवसायाला खुल्या जागा द्या.' पुढे ते म्हणाले, 'मी असं ऐकलंय की पोलिसांचं विशेष पथक ठेवलेलं आहे. मी त्यांनाही सांगतो की, सरकार येतं आणि जातं, तुमचा रेकॉर्ड खराब करू नका. नोंद तुमच्याकडेही होते आणि जनतेकडेही होते.

**५० खोके कमी पडायला लागले म्हणून...**

उद्धव ठाकरे म्हणाले, 'अदाणींची सुपारी घेणाऱ्या दलालांना सांगतो, हा किती मोठा अडकित्ता आहे . तुमची दलाली चेचून ठेचून टाकू की पुन्हा तुम्ही अदाणींची नाव घेणार नाही . ५० खोके कमी पडायला लागले म्हणून मुंबई आणि धारावी गिळायला बोके निघाले आहेत . यांची मस्त वाढत चालली आहे . एकतर हे असंवैधानिक सरकार आहे .'

**हे सरकार अदाणींच्या दारी आहे**

'वर्षा गायकवाड यांनी अदाणींना प्रश्न विचारला, तर भाजपा उत्तर देते . नशिब समजा तुमची अजून महुआ मोईत्रा करण्यात आली नाही . महुआ मोईत्रांनी त्यांना (अदाणींना) प्रश्न विचारल्यावर निलंबित करण्यात आलं . नशिब तुम्ही अजूनही सभागृहात जात आहात . 'सरकार आपल्या दारी' हा कार्यक्रम चालू होता . पण, हे ह्यसरकार अदाणींच्या दारी' आहे,' अशी टीका उद्धव ठाकरेंनी सरकारवर केली आहे .


## "नाऽ निती, नाऽ नितीमत्ता"... धारावी मोर्चावरुन नारायण राणेंचा उद्धव ठाकरेंवर प्रहार



**■मुंबई। सचिन कदम,**

राज्य सरकारने मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार, ह्या प्रकल्पाचं काम अदानी उद्योग समुहाला देण्यात आलं आहे. त्यास, शिवसेना उद्धव ठाकरे गटाने विरोध दर्शवला आहे. त्यावरुन, आता चांगलंच राजकारण होताना दिसत आहे. अदानी उद्योगसमुहाकडून होणाऱ्या धारावीच्या पुनर्विकासाविरोधात ठाकरे गटाने पुकारलेल्या महामोचार्ला उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली आहे. या मोर्चात शिवसैनिकांसह महाविकास आघाडी आणि डाव्या पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले आहे. त्यावरुन, भाजपा नेत्यांनी शिवसेना (उबाठा) आणि उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं आहे. मुंबईतील धारावी टी जंक्शनपासून हा मोर्चा सुरू झाला असून अदानींच्या कार्यालयापर्यंत जाणार आहे. धारावीचा पुनर्विकास अदानींनी करण्याऐवजी तो स्वतः सरकारने करावा, अशी प्रमुख मागणी ठाकरे गटातील मोर्चेकऱ्यांकडून करण्यात येत आहे. यासह, मोर्चाच्या माध्यमातून काही मागण्याही होत आहेत. मात्र, हा मोर्चा केवळ राजकीय हेतुने आणि आर्थिक लाभासाठी असल्याचा आरोपही शिवसेनेवर होत आहे. विरोधकांकडून या मोर्चावरुन उद्धव ठाकरेंवर पलटवार केला जात आहे. केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनीही ट्विटरवरुन धारावी पुनर्विकासाला विरोध करणाऱ्या शिवसेना आणि महाविकास आघाडीवर टीका केलीय.

## 'शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण व्यक्ती सुसंस्कृतही असणे आवश्यक,' केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन



**■नागपूर। प्रगती शर्मा,**

शिक्षणाचा संबंध सामाजिक-आर्थिक व्यवस्थेशी देखील आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण असताना ती सुसंस्कृत असणेही आवश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केले. मंथन फॉर अॅकेडेमिया या संस्थेच्या वतीने नवीन शिक्षण धोरणावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. जागतिक दृष्टिकोनातून शिक्षणाची भूमिका कशी असली पाहिजे, या अनुषंगाने चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल गडकरी यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. गडकरी पुढे म्हणाले, शिक्षणाच्या संदर्भात कुठलाही विचार करण्यापूर्वी देशाचा व समाज व्यवस्थेच्या भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षणावर होणारा खर्च हा भविष्यातील नागरिक घडविण्यावर होणारी गुंतवणूक आहे.

आपल्या मार्गदर्शनात तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व कसे असेल यावर देशाचे मूल्यांकन होईल. त्यामुळे पुढील ५० वर्षांचे लक्ष्य डोळ्यापुढे ठेवून शिक्षकांनी काम करण्याची गरज आहे. आपले गाव, जिल्हा, प्रदेश, राज्य आणि नंतर देशातील सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे.

## धोम धरणाचा डावा कालवा फुटला



**■सातारा। दिगंबर जाधव,**

धोम धरणाचा (ता वाई) डावा कालवा पांडे गावच्या हद्दीत मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास फुटला. मोठ्या प्रमाणावर पाणी ओझर्डे गावच्या चंद्रभागा ओढ्यात शिरले. यामुळे झोपेत असलेल्या ऊसतोड मजुरांच्या झोपड्यांत पाणी शिरून त्यांचे संसारपयोगी साहित्य व बैल वाहून गेले. वाहून जाणारे बैल वाचवण्यात यश आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पाटबंधारे, प्रशासन अधिकारी, किसन वीर कारखान्याचे पदाधिकारी, लगतच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी मदतीसाठी धाव घेतली. पांडे (ता वाई) गावच्या हद्दीत धोम धरणाचा डावा कालव्याचा भराव वाहून आज पहाटे कालवा फुटला. हजारो क्युसेक्स पाणी ओझर्डे येथील चंद्रभागा ओढ्यातून वाहत आहे. शेती पिकाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असताना कालवा फुटल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. कालव्यातून साडेपाचशे क्युसेक्स पाणी वाहत होते. कालवा तातडीने बंद करण्यात आला.

## शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा जागर



**■कोल्हापूर। विशाल पाटील,**

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी दि. १८ होत आहे. या सोहळ्याची सुरुवात शनिवारी ग्रंथदिंडीसह ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनाने झाली. कमला महाविद्यालय येथे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यांसह राजा शिवछत्रपती, राजर्षी शाहू स्मरणिका, आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे ग्रंथ ठेवले होते. तेथून टाळमृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात आली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाईसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली.

## पनवेल तालुक्याला स्वतंत्र तहसीलदार नेमण्यास सात महिन्यांचा विलंब



**■पनवेल। भावना जैन,**

पनवेल तालुक्यातील वाढते शहरीकरण तसेच विविध सरकारी प्राधिकरणांच्या कामकाजामुळे पनवेल तालुक्याच्या महसुली कामकाजावर ताण वाढल्याने शासनाने २८ जूनला शासन निर्णय घेऊन तालुक्यातील ८६ गावांसाठीचा कारभार मूळ तहसीलदारांकडे तर उर्वरित १०२ गावांसाठी स्वतंत्र अप्पर तहसीलदारांचे पद निर्माण करण्याचा आदेश काढला. परंतु, सात महिने उलटले तरी शासनाने अप्पर तहसीलदार पदासह अन्य पदांवर अद्याप कोणाचीही नेमणूक केली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पनवेलचे विभाजन झाल्यामुळे पनवेलचा कारभार दोन तहसीलदार कार्यालयातून स्वतंत्रपणे चालविला जाईल असे अपेक्षित होते. शासनाने स्वतंत्र अप्पर तहसीलदार तसेच विभागाअंतर्गत पदांवरील नियुक्ती न केल्याने जुन्या कचेरीतूनच कारभार सध्या सुरू आहे. शासनाने नव्याने निर्माण केलेल्या अप्पर तहसीलदार पदाकडे कनार्ळा, पोयंजे, नेरे, दापिवली, मोर्बे या पाच मंडळांमधील १०२ गावांचा कारभार सोपविला आहे. हा परिसर नैना क्षेत्रात असल्याने येथे लवकर अप्पर तहसीलदार शासनाने नेमल्यास नैनाच्या इतर कामांना गती येईल. शेतकऱ्यांचे न्यायनिवाडे लवकर पार पडतील. सध्या अनेक दाव्यांचा ताण पनवेलच्या मूळ तहसीलदारांवर आहे. नैना प्राधिकरणासोबत विरार- अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

## राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा शब्द पाळावा



**■नागपूर। नितीन देवळेकर,**

मराठा आरक्षणावरून आमदार बच्चू कडू आक्रमक झाल्याचं दिसून आलं. राज्य सरकारने शब्द पाळला नाही तर मी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आंदोलनात उभं राहणार असा थेट इशाराच आमदार बच्चू कडू यांनी दिला. मनोज जरांगे यांनी दिलेली 24 तारीख जवळ येत आहे, 17 तारखेला जरांगे नवीन आंदोलनाची घोषणा करणार आहेत असंही ते म्हणाले. सरकारने मनोज जरांगे यांना आतापर्यंत शिंदे समितीने काय काय काम केलं त्याचा अहवाल द्यावा अशी मागणी बच्चू कडू यांनी केली. अंतरवाली सराटीमध्ये लाठीचार्जच्या वेळी मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, ते गुन्हे सरकारने मागे घ्यावे अशी मागणी करत आमदार बच्चू कडू म्हणाले की मी जरांगे यांना शब्द दिला आहे त्यामुळे मी शब्दांचा पक्का आहे, नाहीतर मी जरांगे यांच्या आंदोलनात सहभागी होणार. मराठा आंदोलनाला बच्चू कडूंचा पाठिंबा आमदार बच्चू कडू यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या वेळी राज्य सरकार आणि जरांगे यांच्यामध्ये मध्यस्ती करून जरांगे यांच्या आंदोलन थांबवले होते. त्यानंतर जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारला 24 डिसेंबर पर्यंत मुदत दिली होती.

## 'विकास विरोधी लोकांनी मोर्चा काढला, जनता जशास तसं उत्तर देईल', एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून अदानी समूहाविरोधात शनिवारी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाष्य केले आहे. धारावीच्या मोर्चात संपूर्ण महाराष्ट्रातून लोक बोलावले असून धारावीमधील लोक कमी आहेत. ज्या लोकांना धारावीचा विकास नको आहे, त्या लोकांनी हा मोर्चा काढला आहे. त्यांना जनता जशास तसं उत्तर देईल, अशी अप्रत्यक्षरित्या टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे. दरम्यान, धारावी पुनर्विकास प्रकल्पाविरोधात ठाकरे गटाने आज मोर्चा काढला. या मोर्चामध्ये शिवसैनिकांसह महाविकास आघाडी आणि इतर पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी मोचार्ला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकल्प नुसता चर्चेत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रश्नासाठी अनेकजण आवाज उठवत आहेत. यात शिवसैनिकांचाही समावेश आहे. मी त्यांना आश्वासन दिले होते की, धारावीसाठी गरज पडली तर मुंबईत काय अख्खा महाराष्ट्र उतरवेन. आज मुंबईतील मोजके कार्यकर्तेच रस्त्यावर आले आहेत.

## बिझनेसमधील प्रतिस्पर्धी मित्राच्या मृत्यूसाठी जादूटोणा



**■पुणे। प्रतिनिधी,**

प्रतिस्पर्धी मित्राचा मृत्यू होण्याकरता स्मशान भूमीमध्ये जाऊन अघोरी पूजा करून, पूजेचा व्हिडिओ मित्राला पाठवून देण्याचा धक्कादायक प्रकार लोणी काळभोर हद्दीमध्ये घडला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष अनिष्ट, अघोरी प्रथा व जादूटोना प्रतिबंध कायदा अंतर्गत काळभोर पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश तात्यासाहेब चौधरी ( रा. सो, ता.हवेली. जि. पुणे) याच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी ३१ वर्षीय एका महिलेने फिर्याद दिली आहे. लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर हद्दीतील अमोल मानमोडी व गणेश चौधरी हे दोघे मित्र सोरतापवाडी येथे प्लॉटिंग व्यावसाय करत होते. मात्र, मागील एक वर्षापासून व्यवसायात वाद झाल्याने त्यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला होता. त्यानंतर दोघांनीही प्लॉटिंगचे वेगवेगळे व्यवसाय सुरू केले.

## राज्यभरात १६३ ठिकाणी समूह शाळा उभारणार; शिक्षणाधिकाऱ्यांकडून प्राथमिक प्रस्ताव सादर



**■मुंबई। विशाल कारंडे,**

राज्यात समूह शाळा उभारण्याचा शिक्षण विभागाचा विचार आहे. त्यानुसार आता राज्यभरात १६३ ठिकाणी समूह शाळा उभारण्याचे प्राथमिक प्रस्ताव शिक्षणाधिकाऱ्यांनी आयुक्त कार्यालयाकडे सादर केले आहेत. त्याची व्यवहार्यता तपासून आयुक्त कार्यालयाकडून हे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवले जाणार आहेत. राज्यातील कमी पटाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरेशा सोयी सुविधा मिळत नसल्याने या शाळांचा समूह शाळा पद्धतीने विकास करण्याचा विचार सरकारकडून सुरू आहे. नवीन शिक्षण धोरणात दर्जेदार शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना १८ प्रकारच्या सोयीसुविधा मिळणे अपेक्षित आहे. त्यामध्ये प्रयोगशाळा, ग्रंथालय, बोलक्या भिंती, ग्रीन चॉक बोर्ड, ई-लर्निंग सुविधा, क्रीडांगण, परसबाग, शाळेची संरक्षण भिंत आदींचा समावेश आहे. मात्र शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी वाड्यावस्त्यांवर सुरू झालेल्या अनेक शाळांची पटसंख्या २० पेक्षा कमी आहे.

## पोलीस आयुक्तांची नॉट आउट 'मोक्का' सेंच्युरी; वर्षभरात ६४९ आरोपींवर मोक्का




**■पुणे। अभिजित येरल्लू,**

एक वर्षापूर्वी पुणेपोलिस आयुक्तालयाचा पदभार स्वीकारलेल्या पोलिस आयुक्त रितेश कुमार यांनी नॉट आउट 'मोक्का' सेंच्युरी करत ६४९ आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई केली. यातून तब्बल १०० संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाई केली असून, पोलिस आयुक्तांनी मोक्काचा प्रभावी वापर केल्यामुळे शहरातील अनेक संघटित गुन्हेगारी टोळ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले आहे.आगामी काळातदेखील अशा प्रकारच्या कारवाया सुरूच राहणार असल्याचे सूतोवाच पोलिस आयुक्तांनी यापूर्वी अनेकदा केले आहे. बिबवेवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ८ नाव्हेंबर रोजी कुसळकर किराणा मालाच्या दुकानाच्या गल्लीतून एकजण जात असताना आरोपी सौरभ शिंदे, तेजस जगताप, चंदर राठोड, अनिकेत काटकर आणि पंकेज दिवेकर यांनी आपापसात संगनमत करून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला होता.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# आदिवासींच्या आयुष्यात आरोग्यसेवेची पहाट



**आदिवासी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसुविधा प्रभावीपणे पोचवण्यासाठी व्यवस्थात्मक आणि धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत. 'जेव्हा आपल्या आदिवासी समाजाची भरभराट होईल तेव्हाच भारताची भरभराट होईल. आदिवासी समाजाच्या कल्याणाला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.'**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शक तत्त्वज्ञानाचे अनुसरण करत आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दाखवलेल्या अंत्योदयाच्या मागार्ला स्मरत भारत सरकारचे मार्गक्रमण सुरू आहे. समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषतः सर्वात उपेक्षित आणि असुरक्षित समुदायांपर्यंत विकासाचे फायदे पोचवणे ही सरकारची मूलभूत बांधिलकी आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री मनसुख मांडवीय यांच्या नेतृत्वाखाली, समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषतः आदिवासी समाजातील प्रत्येक वर्गापर्यंत आरोग्य सेवा पोचते की नाही याची खातरजमा करण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने यथायोग्य काळजी घेतली आहे.

राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने (नॅशनल हेल्थ मिशन-एनएचएम) सुरुवातीपासूनच सर्वांना समान, परवडणाऱ्या दरात, खात्रीलायक आणि परिणामकारक आरोग्य सेवा देण्यास प्राधान्य दिले आहे. आदिवासी भागांसह इतर भागातील असुरक्षित समाजघटकांपर्यंत आरोग्यसेवा पोचतील याची काळजी घेतली जात आहे. त्या-त्या भागातील स्थानिक गरजांनुसार, राज्यांना विविध स्तरावर विविध भागांमध्ये आरोग्यसेवा देता याव्यात या दृष्टीने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने आरोग्य नियोजनाच्या विकेंद्रीकरणावर लक्ष केंद्रित केले आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ ने आदिवासी आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित लोकांच्या विशेष आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन, या भागांत आरोग्यसेवांची तरतूद करत, त्यांच्या वितरणासाठी विशिष्ट उपाययोजनांची शिफारस केली आहे. आदिवासी मूल्य प्रणाली, परंपरा, सामाजिक-आर्थिक स्थिती यांच्या अनुषंगाने आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी केंद्रीय आदिवासी विकास तसेच शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय बांधिल आहे.

आयुष्मान आरोग्य मंदिर - आरोग्य व्यवस्थेंतर्गत येणाऱ्या सर्व क्षेत्रांतील कार्यवाहीची रचना, केवळ सर्वांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठीच नाही तर आदिवासी भागातील सेवा वितरणाला प्राधान्य देण्यासाठी, ते प्रभावीपणे होण्यासाठी केलेली आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधांची सुरुवात करण्यासाठी नियम शिथिल करणे, प्रत्येक वस्तीवर आशा कर्मचारी नियुक्ती करणे या दिशेने काही पावले उचलली आहेत. आयुष्मान आरोग्य मंदिर (एएएम) हा प्रमुख उपक्रम २०१८ मध्ये छत्तीसगडमधील जंगला या आदिवासी भागात (ब्लॉक-गट) सुरू करण्यात आला. आता या उपक्रमाने देशभरातील ग्रामीण आणि आदिवासी भाग व्यापला असून, १.६३ लाख आयुष्मान आरोग्य मंदिरे सध्या कार्यरत आहेत. वस्तीजवळच सर्वंकष प्राथमिक आरोग्य सुविधा देता यावी अशा प्रकारे या केंद्रांची रचना केली आहे. तर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आर्थिक संरक्षणाची (मदत) हमी देत, दुय्यम व तृतीय श्रेणी सेवादेखील सर्वांना परवडण्याजोग्या बनवल्या जात आहेत; ज्यात अदिम आदिवासी गट लाभार्थी म्हणून पात्र ठरवले आहेत. राज्याच्या सरासरीपेक्षा कमी सर्वसाधारण आरोग्य निर्देशांक असलेले सर्व आदिवासीबहुल जिल्हे, उच्च प्राधान्य जिल्हे (हाय प्रायोरिटी डिस्ट्रिक्ट्स-एचपीडी) म्हणून निश्चित केले असून, त्यांना राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत दरडोई वाढीव साधनसामुग्री मिळते. यामुळे, आदिवासी समुहातील विविध वर्गांना भेडसावणाऱ्या आरोग्यसेवाविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी नवनवीन पद्धती उपयोगात आणण्याकरता, राज्ये/जिल्ह्यांना नवनवीन कल्पना राबवता येतात.

विविध उपक्रम - राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत केलेल्या तरतुदींद्वारे आरोग्यसेवेची उपलब्धता अधिक सुलभ झाली आहे. या तरतुदींनुसार, फिरती वैद्यकीय सुविधा पथके (मोबाईल मेडिकल युनिट्स-एमएमयू) तैनात करता येतात किंवा कमी लोकसंख्येच्या भागातही राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा पुरवता येऊ शकते. या क्षेत्रांतील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, करारान्वये कंत्राटी तत्त्वावर विशिष्ट सेवा घेणे व देणे, 'तुम्ही सांगा, आम्ही पूर्तता करतो' या तत्त्वानुसार मोबदल्याबाबत वाटाघाटी, दुर्गम भागातील सेवेसाठी विशेष भत्ते आणि आरोग्य सेवेत कारकिर्द घडवण्यासाठी प्रगतीच्या नवनव्या संधी खुल्या करणे यासारख्या तरतुदींची हमी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिली आहे. आदिवासी भागातील आरोग्यसेवांना प्राधान्यासाठी आणि त्यांच्या नियोजनासाठी, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, तसेच आदिवासी व्यवहार या दोन्ही विभागांनी परस्पर सहकार्याने आदिवासी आरोग्य कक्ष स्थापला आहे.

# SUPERFOOD KULITH : KNOW THESE 5 BENEFITS OF HORSE GRAM



Kulith, also known as horse gram, is a legume commonly cultivated in arid regions. Scientifically named Macrotyloma uniflorum, it is a drought-resistant crop with small, round seeds that vary in colour, including shades of brown and black. This pulse is a staple in some traditional cuisines, appreciated for its earthy flavour and nutty undertones. Cultivated primarily in India, horse gram is utilised in various culinary preparations like soup, stews, and side dishes. Rich in protein and nutrients, it holds cultural significance and plays a crucial role in certain regional diets, offering a distinct taste and nutritional value. It is believed to aid in various health benefits, let's explore the remarkable benefits that make horse gram a standout addition to a balanced and nourishing diet.

Rich in protein : Horse gram is an excellent source of plant-based protein, crucial for muscle repair, growth, and overall body function. Proteins are made up of amino acids, and horse gram provides a well-balanced profile of essential amino acids, making it a valuable protein source, especially for individuals following vegetarian or vegan diets.

Iron boost : Iron is a vital mineral necessary for the production of haemoglobin, which carries oxygen in the blood. Kulith's high iron content makes it beneficial for preventing and addressing iron-deficiency anaemia. Regular consumption can help improve haemoglobin levels, reducing the risk of fatigue and other symptoms associated with anaemia.

Weight loss companion : Kulith is renowned for its role in weight management. The fibre content in horse gram contributes to a feeling of fullness, promoting satiety and reducing overall calorie intake. Additionally, horse gram may have lipolytic (fat-burning) properties, making it a potential ally in weight loss efforts. The combination of protein and fibre supports weight management by curbing excessive food consumption and promoting a healthy metabolism.

Regulates cholesterol : Preliminary research suggests that Kulith may contribute to favourable changes in cholesterol levels. It appears to have a positive impact on lipid profiles by reducing LDL (bad) cholesterol and promoting HDL (good) cholesterol. These effects can be beneficial for cardiovascular health, potentially lowering the risk of heart-related issues.

Anti-inflammatory properties : Kulith contains antioxidants and anti-inflammatory compounds, such as polyphenols, flavonoids, and phytosterols. These bioactive components may help reduce inflammation in the body, making horse gram potentially beneficial for individuals dealing with inflammatory conditions, joint pain, or other inflammatory disorders.

# राम मंदिराच्या उद्घाटनापूर्वीच 'लक्ष्मण' नाराज



रामानंद सागर यांची लोकप्रिय मालिका 'रामायण' आजही आवडीने बघितली जाते. महत्वाचे म्हणजे, या मालिकेत राम, सीता आणि लक्ष्मण यांची भूमिका साकारणाऱ्या स्टार्सना तर खऱ्या आयुष्यातही प्रेक्षक देवासारखेच मानतात.

या मालिकेत रामाची भूमिका साकारणारे अरुण गोविल आणि सीता मातेची भूमिका साकारणाऱ्या दीपिका चिखलिया यांना अयोध्येतील राम मंदिरातील प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाचे निमंत्रणही पाठविण्यात आले आहे. मात्र, या कार्यक्रमाचे निमंत्रण न मिळाल्याने, मालिकेत लक्ष्मणची भूमिका साकारणारे सुनील लाहिरी नाराज झाले आहेत. त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.

निमंत्रण मिळाले असते तर बरे वाटले असते –

सुनील लाहिरी यांनी नुकतेच 'ईटाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, त्यांना अयोध्येतील राम मंदिरातील प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले नाही. याच बरोबर, आपल्याला प्रत्येक वेळेला बोलवायलाच हवे, आवश्यक नाही. पण असे झाले असते, तर चांगले वाटले असते. असो, यामुळे फार नाराज झालेलो नाही.

सुनील लाहिरी यांनी साधला निशाणा –


सुनील लाहिरी म्हणाले, रकदाचित लक्ष्मण अर्थात माझी भूमिका तेवढी महत्वाची नसेल, असे कार्यक्रम आयोजकांना वाटले असेल अथवा त्यांना मी वैयक्तीकरित्या आवडत नसेल. यामुळे त्यांनी मला निमंत्रण दिले नाही.

# क्रांती रेडकरेनंतर पूजा सावंत लावणार हार्दिक जोशीच्या 'जाऊ बाई गावात' कार्यक्रमात हजेरी



'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेच्या माध्यमातून लोकप्रिय झालेला राणादा म्हणजेच अभिनेता हार्दिक जोशी च्या 'जाऊ बाई गावात' हा कार्यक्रम नुकताच सुरु झाला आहे. ऐशोआरामाच राहणं सोडून आलेल्या ह्या मुली गावच्या वातावरणात राहण्याच्या कसोटीवर कशा उभ्या राहणार, हे पाहणे कमालीचे ठरणार आहे. या कार्यक्रमात पहिली पाहुणी क्रांती रेडकरे पाहुणी आली होती. यानंतर आता अभिनेत्री पूजा सावंत, लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर आणि कोरिओग्राफर मयूर वैद्य येणार आहेत. 'जाऊ बाई गावात' मध्ये रोज नवीन नवीन कार्य स्पर्धकांच्या भेटीस येतात. गावकऱ्यांसोबत राहता राहता काही स्पर्धक उत्सुकतेने कार्य करतात तर काहींसाठी त्या कार्याचा विचार करणे ही तारेवरची कसरत आहे. गावात रोज एक नवा पाहुणा येतो आणि मजेशीर कार्यही सोबत घेऊन येतो. पण येणाऱ्या भागात एक नाही तीन खास पाहुणे येणार आहेत. लावणी सम्राज्ञी सुरेखा पुणेकर, अभिनेत्री पूजा सावंत आणि कोरिओग्राफर मयूर वैद्य आले आहेत.

# 'महामार्गासाठी झाडांची कत्तल करणाऱ्यांना पुढच्या पिढ्या...'



अभिनेता जितेंद्र जोशी हा मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता आहे. गेल्या कित्येक वर्ष तो प्रेक्षकांचं अविरत मनोरंजन करत आहे. अनेक मराठी चित्रपटांत काम करून त्याने अभिनयाचा ठसा उमटवला. जितेंद्र सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. नवीन प्रोजेक्टबाबत तो सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांना माहिती देत असतो. त्याबरोबरच समाजातील अनेक घडामोडीबाबत जितेंद्र त्याच मत अगदी परखडपणे मांडताना दिसतो.

सध्या जितेंद्रच्या एका पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. जितेंद्रने त्याच्या इन्स्टाग्रामवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. शहरीकरण आणि मानवी विकासासाठी पर्यावरणाचा ऱ्हास होण्याबाबत त्याने यातून भाष्य केलं आहे. महामार्ग निर्माण करताना झाडांची कत्तल करणाऱ्या लोकांना आपल्या पुढच्या पिढ्या गुदरमताना दिसत नाहीत. झाडांची अमानुष हत्या होऊ देणारे आपणसुद्धा निर्वंश होऊन मारून टाकले जाणार आहोत. आत्ताच आपापल्यासाठी डांबर तयार ठेवू त्याच रस्त्यांखाली झाडांच्या मृतदेहासोबत झोपी जाण्यासाठी, असं जितेंद्र जोशीने पोस्टमध्ये म्हटलं आहे. जितेंद्रने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

# तिसऱ्या लग्नानंतर पियुष रानडेने बायकोबरोबर शेअर केलेली पोस्ट चर्चेत







गेले काही दिवस हिंदीसह मराठी सिनेसृष्टीत लगीनघाई पहायला मिळत आहे. मराठीतील अनेक कलाकारांनी आपापल्या जोडीदारांबरोबर लगीनगाठ बांधली. प्रसाद-अमृता यांनी पुण्यात शाहीपद्धतीने एकमेकांशी लग्नगाठ बांधली. नुकतेच मुग्धा वैशंपायन हिच्या मोठ्या बहिणीचंही अगदी साधेपणाने लग्न पार पडले. अशातच सुरुची-पियुष हे दोघेही विवाहबंधनात अडकले. पियुष रानडे व सुरुची अडारकर या जोडीने गुपचुप लग्न उरकल्याने त्यांच्या लग्नाच्या अनेक चर्चांना उधाण आले. गेले काही दिवस त्यांच्या लग्नाचे अनेक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. पियुष-सुरुची यांच्या मेहंदी व हळदी समारंभाचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. तसेच दोघांच्या रिसेप्शनच्या लूकमधील फोटोंनासुद्धा चाहत्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. दोघांच्या लग्नाच्या फोटोंनी चाहत्यांसह अनेकांचे लक्ष वेधून घेतलं. सुरुची अडारकरचं हे पहिलंच लग्न आहे. तर पियुष हा तिसऱ्यांदा विवाहबंधनात अडकला आहे. यावरून सोशल मीडियासह अनेक माध्यमातून त्याच्यावर ट्रोलिंग व टीका करण्यात आली. दोघांनी वैयक्तिकरित्या यावर भाष्यही केले आहे. अशातच या दोघांनी यावर पुन्हा एकदा पोस्ट करत त्यांच्यावर टीका-टिप्पणी करणाऱ्यांवर निशाणा साधला आहे.

## HEALTH AND SPORTS

# MOHAMMED SHAMI RULED OUT OF SA TEST SERIES, DEEPAK CHAHAR PULLS OUT OF ODIS





**NEW DELHI :** Team India's ICC World Cup 2023 hero Mohammed Shami will not feature in India's squad ahead of the two-match test series against South Africa. He has been ruled out after the medical team did not clear him due to his fitness issues. Shami is facing an ankle niggle injury after showcasing excellent performances in the ODI World Cup 2023. After displaying his exceptional show with the ball, he was named in the Test squad but his availability was subject to him getting clearance from the BCCI's medical team. The replacement player for Mohammed Shami is yet to be announced by the Board, The first Test between the teams will kick off from December 26 2023 in Centurion. Before the opening Test, the Indian Test team members will play a three-day intra-squad match from December 20. As of now, Shami is likely to continue his recovery at home and he could make a return during the Test series at home against England starting from January 25 in Hyderabad. The second Test against the Proteas will start at Cape Town on January 3, 2024. Chahar to miss ODI series. Pace-bowling all-rounder Deepak Chahar was also withdrawn from the ODI squad after he expressed his unavailability to travel to South Africa because of a family emergency. "Chahar has informed the BCCI that he will not be available for the upcoming ODI series due to a family medical emergency. "The Men's Selection Committee has named (pacer) Akash Deep as his replacement," the BCCI statement read. The BCCI also said in the statement that after the conclusion of the first ODI in Johannesburg on Sunday, Shreyas Iyer will join the Test squad to prepare for the two-match series. "He (Iyer) will not be available for the second and third ODI and will take part in the inter-squad game," it read.

# DEEPTI STARS AS INDIA WOMEN BREAK WORLD RECORD WITH HISTORIC MAIDEN HOME TEST WIN AGAINST ENGLAND



**NEW DELHI :** Deepti Sharma ran riot with a 9-wicket haul in the match as the Indian women's cricket registered a humongous 347-run victory - the biggest margin in the history of women's Tests - over England in the one-off Test at the DY Patil Stadium in Navi Mumbai on Saturday. The previous best was Sri Lanka's 309-run win over Pakistan in Colombo in 1998. It was also India's first win over England at home in 15 Tests, having beaten them in away games twice in 2014, giving them a big boost ahead of the one-off Test against Australia starting here next week. After a patient 113-ball 67 in India's first-innings total of 428, Deepti destroyed England line-up with a sensational 5.3-4-7-5 spell helping the hosts take a massive 292-run lead. After her stellar with both bat and ball in the first innings, Deepti got the England batters in a tangle once again to finish with figures of 4/32 in the second innings. She narrowly missed out on being the second Indian female cricketer to register a 10-wicket match haul after the legendary Jhulan Goswami. "I was just waiting to bowl and keeping myself warmed up, got a lot of help from the wicket and I backed myself. Harry di (Harmanpreet) was saying bowl in your areas and the turn will help you. We want to continue this in the next Test," she said after the match. A hapless England side were bowled out for 131 in 27.3 overs on Day 3 of the Test match. India took all 10 England wickets in the first session of the third day. The Heather Knight-led side lasted only 63 overs in the entire match. They were bowled out for 136 in just 35.3 overs in the first innings. India captain Harmanpreet Kaur declared at the overnight score of 186/6 to set England a daunting target of 479.

# T20 WORLD CUP 2024: INDIA LIKELY TO FACE PAKISTAN IN NEW YORK



**NEW DELHI :** With the 2024 Men's T20 World Cup set to be jointly held in the West Indies and United States of America (USA), India could be facing off against Pakistan in the group stage of the tournament at the pop-up stadium in Long Island, New York.A report in The Guardian said the ICC and local organising committees will be signing on the full schedule, with the tournament to be held from June 4-30. The Eisenhower Park on Long Island will have a temporary 34,000 seater stadium.

# SURYA'S BROKEN HEART TWEET GIVES RISE TO CONSPIRACY THEORIES ABOUT MI'S DECISION TO REPLACE ROHIT WITH HARDIK AS CAPTAIN



**NEW DELHI :** A lot can happen over an emoji, even if not intended to. Such is the world of social media. Suryakumar Yadav's latest tweet on Saturday is the perfect example of that. The world's No.1 T20I batter took to X to post an emoji of a broken heart. Considering it came from a man who recently scored his fourth T20I century - joint most with Rohit Sharma and Glenn Maxwell - and led India to a series-equalling victory over South Africa, it seemed doubly odd. No wonder, the tweet garnered 52 thousand likes, 11 thousand reposts and about 5 thousand comments in just three hours. But why? What does the broken heart emoji mean? Is it because of the video of an incident inside India's team bus that went viral recently? In that video, Surya was seen talking to Arshdeep Singh animatedly after the third T20I against South Africa. Or does it have something to do with the recent developments at his IPL franchise, Mumbai Indians? MI named Hardik Pandya as their captain, putting an end to Rohit Sharma's nearly 11-year-long journey as the franchise's leader. Both Surya and Hardik made their MI debuts under Rohit's captaincy. While Surya continues to be an integral part of MI along with Jasprit Bumrah and Ishan Kishan, the change in leadership is bound to have its effects. Whatever may be the reason behind Surya's tweet, it surely caught the fans' attention. The majority of the reactions to that tweet, which had 3 million views in 3 hours, were related to the captaincy change in MI. Pandya, 30, returned to his former franchise Mumbai only last month in a high-profile trade after a successful two-year stint with Gujarat Titans. Mumbai Indians said the change in leadership was a part of their future planning and thanked Rohit, the joint-most-successful captain in the tournament's history alongside Chennai Super Kings' M.S. Dhoni. "It is part of legacy building and staying true to the MI philosophy of being future-ready," Mahela Jayawardene, Mumbai's global head of performance, said in a statement late Friday. "It is in keeping with this philosophy that Hardik Pandya will assume captaincy of Mumbai Indians for the IPL 2024 season."

# POSTPARTUM FITNESS EATING: RIGHT DIETARY CHOICES FOR A HEALTHY HEART



The postpartum period is a critical phase in a woman's life, marked by numerous physiological changes and adjustments hence, it is essential to focus on nutrition during this time to support recovery, overall well-being and especially heart health. Read on as we discuss the importance of postpartum healthy eating, highlight the dietary choices that can contribute to a healthy heart and provide practical tips for maintaining a balanced diet during this phase of life. In an interview with HT Lifestyle, Bhakti Samant, Mumbai, shared, "First, a woman's body undergoes significant changes during pregnancy and childbirth, including fluctuations in hormones, increased blood volume, and possible weight gain. These changes can impact heart health and increase the risk of certain conditions, such as gestational diabetes or hypertension. A healthy postpartum diet can help manage these risks and support recovery." She added, "The nutritional needs of lactating mothers are different from those of pregnant women. Nutrient-rich foods are essential to provide energy and nourishment for both the mother and her baby. Moreover, the postpartum period is often accompanied by sleep deprivation and stress, which can put extra strain on the heart. Proper nutrition can mitigate these effects and maintain a healthy cardiovascular system."

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

# 'शरद पवार यांनी एकदा तरी मराठा आरक्षणाविरोधात वक्तव्य केल्याचे दाखवून द्या', जितेंद्र आव्हाड यांचे देवेंद्र फडणवीसांना खुले आव्हान



**■ठाणे। प्रतिनिधी,**

आपण अयशस्वी होत असल्याचे लक्षात आल्यावर दुसऱ्याच्या डोक्यावर नारळ फोडणे, हे त्यांचे पहिल्यापासून काम आहे, अशी टीका करत शरद पवार यांनी एकदा तरी मराठा आरक्षणाविरोधात वक्तव्य केल्याचे दाखवून द्यावे, असे खुले आव्हान राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते जितेंद्र आव्हाड यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. नागपूर येथील भाजपाच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या महाविजय २०२४ मेळाव्यात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली. मराठा आरक्षणाच्या संदर्भात आज राज्यात मोठी आंदोलने चालली आहेत. मराठा आरक्षणाचा इतिहास काढून पाहिला तर मराठा आरक्षणाला सर्वाधिक विरोध कुणी केला असेल तर तो शरद पवारांनी केला होता, असा आरोप उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केला. त्याला राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिउत्तर दिले आहे.

महाराष्ट्राचा राजकारण व्यवस्थित अभ्यासले तर गेल्या पन्नास वर्षांमध्ये आपण अयशस्वी झालो की त्याचे खापर हे शरद पवार यांच्या नावावर फोडायचे. ही जुनीच पध्दत आहे. धनगरांना आरक्षण देणार होता आणि तेही पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत. पण, त्यांना अद्याप आरक्षण देऊ शकले नाही. मुस्लिम तसेच लिंगायत समाजाला आरक्षण देऊ शकले नाही. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हात लावून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण देऊ असे सांगितले होते. तारीख जवळ आली तरी आरक्षणाबाबत काहीच झालेले नाही. त्यांनी दिलेली प्रत्येक आश्वासने फेल झाली आणि त्यामुळे विषयाला बगल देण्यासाठी शरद पवार यांचे नाव घेत आहेत, अशी टीका आव्हाड यांनी केली.

द्वेष आणि समाजात भांडण लावण्याची क्रिया, ही अयशस्वी होत असल्यामुळे तुम्ही बिथरले आहात. यामुळेच तुम्ही शरद पवार यांचे नाव घेत आहात, अशी टीकाही त्यांनी केली. सर्व आश्वासने फेल झाल्यामुळेही आरक्षणाच्या बाबतीत कात्रीत सापडलेले शिंदे सरकार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आता शरद पवार यांचे नाव घेत आहे. पण लोकांना माहिती यात शरद पवार यांचा काहीही संबंध नाही, असेही ते म्हणाले.

# नैनाबाधितांचे उपोषण स्थगित




**■पनवेल। प्रतिनिधी,**

दहा दिवसांपासून सुरू असलेले पनवेल तालुक्यातील नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र (नैना) रद्द करण्यासाठी आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय उपोषणकर्त्यांनी घेतला. नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनात शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. रायगड जिल्ह्यातील विविध सरकारी प्रकल्पांची यामध्ये चर्चा करण्यात आली. नैनाविषयी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जयंत पाटील तसेच माजी आमदार बाळाराम पाटील, ॲड. सुरेश ठाकूर, अतुल म्हात्रे यांच्याशी चर्चा केली. नैनाप्रश्नी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक बोलावू या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्याचे ठरले. या बैठकीतील चचेर्चा निरोप घेऊन पनवेलचे प्रांत अधिकारी राहुल मुंडके उपोषणकर्त्यांना भेटल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय उपोषणकर्त्यांनी जाहीर केला.

# इन्स्टाग्रामवर आमिष दाखवून २८ लाखांची फसवणूक




**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

इन्स्टाग्राम आयडी फॉलो करून भरघोस पैसे मिळवा असे आमिष दाखवून नवी मुंबईतील एका व्यक्तीची तब्बल २८ लाख ९० हजार ४०२ रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस तपास करीत आहेत. मकरंद गुंडरे असे यातील फिर्यादी यांचे नाव आहे. त्यांना २९ ऑक्टोबर रोजी एक फोन आला. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने त्यांना इन्स्ट्राग्रामवर फॉलो लाईक करा, प्रत्येक दोन लाईक किंवा फॉलोला २१० रुपये मिळतील, असे आमिष दाखवले. सुरूवातीला मकरंद यांनी दोन फॉलो करताच त्यांना ४२० रुपये आले. तसेच त्यानंतरही केल्यावर पटापट पैसे मिळाले. काही दिवसांनी फोन वरील व्यक्तीने प्रीपेड योजना सांगितली त्यानुसार २ हजार रुपये भरल्यावर टास्क पूर्ण होताच २ हजार ८०० रुपये मिळतील असे आमिष दाखवले म्हणून मकरंद यांनी फोन वरील व्यक्तीने दिलेल्या बँक खात्यावर २ हजार रुपये भरले. अशाच प्रकारे अनेकदा पैसे भरण्यास सांगून पैशांचा परतावा आणि फॉलो करण्याचे पैसेही देण्यात आले. दरम्यान त्यांना पैसे विविध बँक खात्यावर भरण्यास भाग पाडण्यात आले.

# दप्तरांमुळे लहान मुलांच्या मणक्यावर वजन, वाढतेय पाठदुखीची समस्या, तज्ज्ञांचा महत्त्वाचा इशारा



**■पनवेल। प्रतिनिधी,**

शाळेच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी प्रयत्न झाले, परंतु त्याला फारसे यश आलेले नाही. दप्तराचे योग्य वजन समजून घेणे, योग्य दप्तराची निवड करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे, असे मत रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. प्रमोद भोर यांनी व्यक्त केले. नवी मुंबईतील फोर्टिस रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या मुलांमध्ये पाठदुखीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पाठदुखी टाळण्यासाठी दप्तराचा योग्य पद्धतीने वापर करणे गरजेचे आहे. पाठदुखीचा संबंध प्रौढांशी जोडला जात असला, तरी मुलांमध्येही ही समस्या सर्रास आढळून येते. पाठीवरील दप्तराचे ओझे, वर्गात किंवा घरी बसण्याची अयोग्य पद्धत आणि वारंवार फोन किंवा टॅबलेटचा वापर या गोष्टीदेखील तितक्याच कारणीभूत ठरतात. दप्तराचे वजन इयत्ता पहिली आणि दुसरीमधील मुलांसाठी १.५ ते दोन किलो, तिसरी ते पाचवीमधील मुलांसाठी दोन ते तीन किलो, सहावी ते आठवीच्या मुलांसाठी तीन ते चार किलो, तर इयत्ता नववी आणि दहावीच्या मुलांसाठी पाच किलो वजनाचे दप्तर शारीरिक क्षमतेनुसार योग्य आहे. तरीदेखील कोवळ्या मुलांच्या पाठीवर जितके वजन कमी असेल तितके चांगले, असे मत त्यांनी व्यक्त केले. मुलांनी दप्तर योग्यरित्या अडकवले आहे का, फोन किंवा टॅबलेट वापरताना बसण्याच्या योग्य पद्धतीचा वापर करतात का, मुलांचा आहार जीवनसत्त्व ड आणि कॅल्शियमयुक्त आहे का, याकडे पालकांनी लक्ष द्यावे. मुलांच्या आहाराबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांना पाठदुखीचा त्रास होत असेल, तर त्यांच्या पाठीवरील ओझे किंवा शाळेत बसण्याच्या स्थितीकडे विशेष लक्ष द्यावे.

# सेवा रस्त्यांवर बेकायदा वाहने उभी करणे पडले महागात, ठाणे वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांवर कारवाई



**■ठाणे। प्रतिनिधी,**

शहरातील सेवा रस्त्यांवर बेकायदा उभ्या असलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. गेल्या सहा दिवसांत विविध भागातील अशा प्रकारच्या १ हजार १२२ वाहनांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. नागरिकांचा प्रवास हा सुरळीत आणि कोंडीमूक्त व्हावा यासाठी ९ डिसेंबरपासून ठाणे वाहतूक शाखेकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेमुळे शहरातील सेवा रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असल्याचे चित्र आहे. ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात पार्किंगची समस्या आहे. पार्किंगसाठी पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध होत नाही, तसेच अनेकजण पार्किंगचे शुल्क भरावे लागू नये म्हणून सेवा रस्ता तसेच शहरातील अंतर्गत मार्गावर बेकायदेशिररित्या वाहने उभी करतात, असे चित्र दिसून येते. या वाहनांमुळे वाहतुकीस तसेच पादचाऱ्यांनाही अडथळा निर्माण होत असतो. आधिच रस्ते अरुंद त्यात वाहनांची पार्किंग यामुळे अनेकदा वाहतूक कोंडी होत असते. सेवा रस्त्यावर होणारी ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाणे वाहतूक शाखेकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# कल्याण शहर मनसेच्या महिला अध्यक्षा गॅस सिलेंडर स्फोटात गंभीर जखमी



**■कल्याण। प्रतिनिधी,**

येथील खडकपाडा भागात शुक्रवारी दुपारी घरगुती सिलेंडरमधून गॅसची गळती होऊन झालेल्या स्फोटात कल्याण शहर मनसेच्या महिला अध्यक्षा शितल विखणकर या गंभीररित्या जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर नवी मुंबई नॅशनल बर्न रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

त्या ८० टक्के भाजल्या आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. कल्याण शहर मनसेच्या अध्यक्षा शितल विखणकर या खडकपाडा भागात राहतात. शुक्रवारी दुपारी त्या घरात स्वयंपाक करत होत्या. यावेळी सिलेंडर टाकीचा स्फोट झाला. या स्फोटात त्या गंभीररित्या भाजल्या. सिलेंडर टाकीचा स्फोट झाल्याने सोसायटीतील नागरिकांनी तातडीने विखणकर यांच्या घराकडे धाव घेतली. त्यांना तातडीने भिवंडी कोन येथील वेद रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून त्यांना नवी मुंबईतील बर्न रुग्णालयात नेण्यात आले. अग्निशमन दल, पोलीस, गॅस पुरवठादारांना तातडीने घटनास्थळी बोलविण्यात आले. त्यांनी सिलेंडरचा रेग्युलटर आणि बाहेर पडणारा गॅस रोखण्याची पहिली प्रक्रिया केली.

सिलेंडरचा रेग्युलटर टाकीला बसविताना तो घट्ट बसविला नसावा. त्यामुळे गॅस सुरू करताना गळती झाली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. खडकपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणाची नोंद करण्यात आली आहे.

# वाहनांच्या सुट्या भागांची बेकायदा विक्री, कळंबोलीतील पोलाद बाजारातील प्रकार



**■पनवेल। प्रतिनिधी,**

कळंबोली येथील पोलाद बाजारामध्ये शंभराहून अधिक भंगार व्यावसायिकांच्या दुकानात दुचाकी, मोटारींसह अवजड वाहनांच्या इंजिनासह सुटे भाग रस्त्यावर बेकायदा विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. हा बेकायदा व्यवसाय तेजीत सुरू असून याकडे पोलीस प्रशासन, आरटीओकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पोलाद बाजारामध्ये २० वेगवेगळ्या गाळ्यांमध्ये वाहने कापण्याचे आणि वाहने कापल्यानंतर मिळालेले सुटे भाग १०० गाळ्यांच्या समोरील रस्त्यावर खुलेआम भंगारविक्री करण्याचा बेकायदा व्यवसाय तेजीत सुरू आहे. विशेष म्हणजे पोलाद बाजारात पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आहे. या कार्यालयामध्ये १५ हून अधिक अधिकारी काम करतात. मात्र आरटीओच्या अधिकाऱ्यांना बेकायदा वाहनांची इंजिन विक्री दिसूनही कारवाई केली जात नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नवी मुंबई प्रादेशिक परिवहन विभागाने बसच्या तपासणीतून दोन राज्यांत एकाच बसची नोंदणी असल्याचे प्रकरण उघड केले. असे असताना वाहनांच्या सुट्या भागांच्या बेकायदा विक्रीबाबत पनवेल आरटीओच्या अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी याबाबत तपासणी करण्याचे अधिकार शासनाने दिले नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे कळंबोलीतील वाहनांचे सुटे भाग विकणाऱ्या मंडळींनी याच नियमाचा आधार घेऊन ही दुकाने थाटली आहेत. शंभराहून अधिक भंगार व्यावसायिकांकडे वाहनांचे सुटे भाग आले कुठून याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. रस्त्यावर बेकायदा इंजिन व चेसिस क्रमांकांची चौकशी आरटीओ विभागातील अधिकाऱ्यांना घेऊन पोलिसांनी केल्यास असंख्य वाहनचोरीच्या प्रकरणांना वाचा फुटू शकेल.

# रेल्वेच्या मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांचे मेगा हाल, सोयीसाठी एसटी आगाराकडून ज्यादा फेऱ्या



**■बोईसर। प्रतिनिधी,**

पश्चिम रेल्वेवरील दोन तासांच्या मेगा ब्लॉकमुळे पालघर ते डहाणू दरम्यान उपनगरीय लोकल सेवेवर परीणाम होऊन काही गाड्यांच्या पालघर ते डहाणू दरम्यानच्या सेवा रद्द करण्यात आल्यामुळे प्रवाशांचे मेगा हाल झाले. प्रवाशांच्या सेवेसाठी बोईसर व पालघर एसटी आगारामार्फत जादा फेऱ्या सोडण्यात आल्याने प्रवाशांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. तरी देखील वयोवृद्ध व लहान मुलांना एसटी बसमध्ये होणाऱ्या गर्दीमुळे शिरणे त्रासदाय झाल्याचे दिसून आले.

पश्चिम उपनगरी रेल्वे मार्गावरील पालघर स्थानकाजवळील कामासाठी शनिवारी व रविवारी दुपारी १० ते १२ वाजेदरम्यान दोन तासांचा मेगा ब्लॉक घेण्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे विरारवरून डहाणूकडे जाणाऱ्या व डहाणूवरून विरारकडे जाणाऱ्या उपनगरीय लोकल सेवेवर या मेगा ब्लॉकचा परीणाम झाला. विरारवरून डहाणूकडे जाणाऱ्या चार लोकल पालघर ते डहाणू स्थानकादरम्यान रद्द करण्यात आल्याने पालघर पर्यंत सोडण्यात आल्या. तर डहाणूवरून विरारकडे जाणाऱ्या तीन लोकल व वापी विरार शटल रद्द करण्यात येऊन पालघर स्थानकातून सोडण्यात आल्या. यामुळे डहाणू, वाणगाव, बोईसर व उमरोळी परीसरातील चाकरमानी, प्रवासी, लग्नसराईसाठी बाहेर पडलेले नागरीक यांचे मोठे हाल झाले.

दोन तास लोकल सेवा बंद असल्यामुळे अनेक प्रवाशांनी सार्वजनिक व खाजगी वाहतूक सेवेचा आधार घेतला. पालघर आगाराकडून बोईसर पर्यंत चार तर बोईसर आगाराकडून पालघरपर्यंत १२ ज्यादा एसटी फेऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी सोडण्यात आल्या. अशाच प्रकारचा मेगा ब्लॉक उद्या रविवारी घेण्यात येणार असल्याने लग्नसराईचा मोठा मुहूर्त असल्याने नागरिकांनी या संदर्भात दखल घेऊन पर्यायी व्यवस्थेचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# मतपेरणीसाठी पालघरमध्ये सत्ताधाऱ्यांचे असेही तंत्र!




**■पालघर। प्रतिनिधी,**

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आपल्या पक्षाकडे खेचण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे. त्यामध्ये सत्ताधारी गटाच्या घटक पक्षांनी केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना थेट लाभार्थी असलेल्या मतदारांपर्यंत पोहोचून निश्चित मतांची बेगामी करण्याचे तंत्र अवलंबले आहे. विविध योजनेतून त्या दृष्टीने अंमलबजावणी होत असून सत्ताकारण असलेल्या घटक पक्षांमध्ये चढाओढ सुरू आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) संपर्कप्रमुख रवींद्र फाटक यांनी त्यांच्या पक्षाच्या लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांची मनोर येथे अलीकडेच बैठक घेऊन पक्षाने आपल्याला सर्व काही दिले असताना आपण पक्षासाठी काय दिले अशी विचारणा करून कडक भाषेत कार्यकर्त्यांची कानउघाडणी केली. शिवसेनेने शिवदूत नेमण्याची योजना हाती घेतली असताना त्याला पालघर जिल्ह्यातून मिळत असलेल्या अत्यल्प प्रतिसादाबद्दल तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. राज्य व केंद्र सरकारच्या योजना थेट मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी गावोगावी शिबिर घेण्याचा सपाटा लावण्याचे निर्देशित करण्यात आले असून सरकारी योजनेपासून वंचित असलेल्या नागरिकांचे नोंदणी अर्ज भरून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य पक्षांच्या कार्यकर्त्यांनी करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

# टिटवाळा येथे मेलच्या धडकेत मोटरमनचा जागीच मृत्यू



**■कल्याण। प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेच्या मुंबई-नाशिक रेल्वे मार्गावरील टिटवाळा रेल्वे स्थानक येथे शनिवारी सकाळी एका भरधाव मेलने दिलेल्या धडकेत एका मोटरमनचा जागीच मृत्यू झाला. या घटनेबद्दल मोटारमन संघटनेने हळहळ व्यक्त केली आहे. डी. के. नाग असे अपघातात मरण पावलेल्या मोटरमनचे नाव आहे. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात याप्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवराज मानसपुरे यांनी सांगितले, मोटरमन नाग हे टिटवाळा येथील मोटरमन खोलीत निवासाला होते. शनिवारी सकाळची ६.४६ च्या टिटवाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकलचे ते सारथ्य करणार होते. टिटवाळा लोकल सकाळी रेल्वे स्थानकात आल्यानंतर मोटरमन नाग हे त्या लोकलचा ताबा घेण्यासाठी रेल्वे मोटरमन निवासातून टिटवाळा रेल्वे स्थानकाकडे रेल्वे मागार्तून चालले होते. रेल्वे मार्ग ओलांडत असताना त्यांना नाशिककडून मुंबईकडे जाणारी गोरखपूर एक्सप्रेसची धडक बसली. त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी तत्काळ रेल्वे सुरक्षा जवान, रेल्वे स्थानक मास्तर यांनी पोहोचून ही माहिती वरिष्ठांना दिली. नाग यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पालिकेच्या कल्याणमधील रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आला आहे, असे लोहमार्ग पोलिसांनी सांगितले.

# चालत्या रिक्षाला कार आडवी, तरुणावर सपासप वार, माजी पंचायत समिती सभापतीचं धक्कादायक कृत्य



**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जुन्या भांडणाच्या रागातून माजी सभापतीने तरुणाचे हात छाटल्याची घटना घडली आहे. मुरबाड पंचायत समितीच्या माजी सभापतीने गावातील एका तरुणावर भररस्त्यात आपल्या साथीदारांच्या मदतीने तलवारीने सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केलं. यामुळे परिसरात खळबळ उडून भीतीचे वातावरण पसरलं आहे. मुरबाडमध्ये पोलिसांच्या गस्तीने सर्वत्र शांतता व सुव्यवस्था असतानाच आज संध्याकाळी मुरबाड बारवी धरण रस्त्यावरील शाळेसमोर देवपे गावातील तरुण सुशील भोईर (वय २७ वर्ष) हा रिक्षाने जात असताना मुरबाड पंचायत समितीचे माजी सभापती श्रीकांत धुमाळ आपल्या साथीदारांसह कारने येऊन रिक्षा अडवली.

सुशीलला बाहेर काढून तलवारीने सपासप वार करत दोन्ही हात छाटून टाकले. यात तो गंभीर जखमी झाला आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी श्रीकांत धुमाळ याच्यासह त्याचा मेहुणा अंकुश खारीक, नितीन धुमाळ व इतर यांच्यावर मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# ठाण्यात एमएसआरडीसीच्या बड्या अधिकाऱ्याच्या मुलाची प्रेयसीला मारहाण



**■ठाणे। प्रतिनिधी,**

एमएसआरडीसीच्या बड्या अधिकाऱ्याच्या सुपुत्राने आपल्याच प्रेयसीला भेटण्याच्या बहाण्याने बोलावून शिवीगाळ व मारहाण करीत गाडीखाली चिरडल्याची घटना ठाण्यात घडली आहे. यावेळी प्रियकराने तिच्या हाताचा चावा घेतला. प्रेयसी फियार्दी प्रिया उमेंद्र सिंग असे तरुणीचे नाव असून अश्वाजीत गायकवाड असे तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी तरुणीने आपल्या सोशल मीडियावर या बाबतची पोस्ट टाकल्यानंतर घटनेचा खुलासा झाला. या घटनेत प्रिया गंभीर जखमी झाली असून तिच्यावर घोडबंदर रोडवरील टायटन मेडिसिटी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात प्रियकर अश्वजित गायकवाड, शिवीगाळ करणारा रोमिल पाटील आणि वाहन चालक सागर शेळके यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. फियार्दी प्रिया उमेद्र सिंग(२६) रा. १७०१, ए विंग, ललानी रेसिडन्सी, बाघबीळ, सुरज वॉटरपार्क समोर, जी.बी. रोड, ठाणे(प) हिचे एमएसआरडीसीच्या बड्या अधिकाऱ्याचा मुलगा अश्वजीत गायकवाड(३४) रा. रोडास हिरानंदानी इस्टेट घोडबंदर रोड, ठाणे याच्याशी मागील चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते. प्रेयसी फियार्दी प्रिया ही नवी मुंबईतील खारघर येथे बॉम्बे नेल कंपनी नावाचे सलून चालविते. तिला सादर सलून चालविण्यासाठी बहीण आणि भाऊ मदत करतात. काही कारणास्तव अश्वजीत गायकवाड याच्याशी बिनसले होते. त्याने ११ डिसेंबर, २०२३ रोजी प्रियाला फोन करून कोर्टयार्ड हॉटेल ओयळा या ठिकाणी बोलावले.

# विरार - वर्सोवा सागरी सेतू प्रकल्पाला विरोध; अर्नाळा, उत्तन मच्छीमार संघटनांनी सर्वेक्षणाचे काम बंद पाडले



**■वसई। प्रतिनिधी,**

विरार-वसोर्वा सागरी सेतू प्रकल्प उभारणीच्या संदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. या प्रकल्पामुळे किनाऱ्यालगतचे कोळीवाडे व मच्छीमारांच्या व्यवसायावर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या विरोधाची धार अधिक तीव्र झाली आहे. नुकताच विरार अनार्ळा येथे बैठकीतही या प्रकल्पाबाबत विरोध दर्शवला तर शुक्रवारी उत्तन येथील समुद्र किनाऱ्यावर सर्वेक्षणही बंद पाडत विरोध केला आहे. वसोर्वा ते विरार असा सुमारे ४२.७५ किलोमीटरचा सागरी सेतू तयार करण्याचा प्रकल्प शासनाने नियोजित केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मार्फत हा प्रकल्प तयार केला जाणार आहे. या प्रकल्प उभारणीसाठी प्राथमिक स्तरावरून हळूहळू हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.नुकताच याबाबत एमएमआरडीएचे अधिकारी व मच्छिमार संघटना यांची विरार अनार्ळा येथे बैठक पार पडली. मात्र या प्रकल्पामुळे सागरी किनाऱ्यालगत असलेले कोळीवाडे व व तेथील मच्छीमारांचा पारंपारिक व्यवसाय अडचणीत सापडणार आहे. त्यामुळे आमचा या प्रकल्पाला विरोधच आहे, असे येथील मच्छीमारांनी सांगितले आहे. वसई विरारच्या अनार्ळा भागातून सुमारे तीनशे मच्छीमारांच्या बोटी समुद्रात मासेमारीसाठी जात आहेत. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच तेथील बांधवांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. आधीच समुद्रात निर्माण होणाऱ्या विविध अडचणी यामुळे मच्छीमार अडचणीत आहेत. त्यातच आता वसोर्वा व विरार सागरी सेतू प्रकल्पामुळे त्याचे बंदरही आमच्या भागात होणार आहे याशिवाय समुद्रात बांधकामही केले जाणार आहे त्यामुळे आमच्या बोटी ये-जा करण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होणार आहे. याशिवाय मत्स्य उत्पादनही कमी होईल आणि याचा परिणाम आमच्या मच्छीमार बांधवांवर होणार आहे, त्यामुळे आम्ही तीव्र विरोध केला असल्याचे अनार्ळा येथील महाराष्ट्र कृती समितीचे चिटणीस मोरेश्वर वैती यांनी सांगितले. एमएमआरडीएचे अधिकारी आम्हाला प्रकल्पाचे सादरीकरण दाखवीत होते. आम्हाला प्रकल्पच नको आहे त्यामुळे आम्ही ते सादरीकरण बघणार नाही, अशी भूमिका घेत मच्छीमार बांधवांनी कडाडून विरोध नोंदविला.

१) कोळीवाडे नष्ट होण्याची भीती

वसोर्वा-विरार सागरी सेतू उभारण्यासाठी एमएमआरडीएकडून प्रत्यक्ष सर्वेक्षणास सुरुवात करण्यात आली आहे. मात्र या प्रकल्पाबाबत मच्छीमारांना माहिती दिली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. शुक्रवारी भाईंदर पश्चिम येथील उत्तन किनार पट्ट्यात सर्वेक्षणासाठी आलेल्या पथकाला मच्छीमार बांधवानी समुद्रात जाऊन विरोध केला आहे. या प्रकल्पामुळे आमचे कोळीवाडे नष्ट होणार असल्याची प्रतिक्रिया विरोधासाठी समुद्रात गेलेले माजी नगरसेवक जॉर्जी गोविंद यांनी दिली आहे.